# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ३२० दिनांक :- १७/११/२०२१

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ- २ व ३ मधील पोलीस स्टेशनला १३ नवीन चारचाकी वाहनांचे वाटप.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे केलेल्या मागणीप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्या जिल्हा वार्षिक योजनेतून १३ बोलेरो जीप वाहने प्राप्त झाल्याने मा. श्री. दादासाहेब भुसे, पालकमंत्री पालघर जिल्हा यांचे हस्ते पोलीस उपआयुक्त परिमंडळ २ व ३ मधील पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेला सदर वाहनांचे आज दिनांक १७/११/२०२१ रोजी ‘पोलीस वाहन हस्तांतरण व पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्याशी संवाद’ या कार्यक्रमाप्रसंगी वाटप करण्यात आलेले आहे. सदर वाहने नवीन आयुक्तालयातील दैनंदिन कामकाज तसेच नव्याने चालू केलेल्या डायल ११२ प्रमाणेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणार आहे. सदर कार्यक्रमात मा. पालकमंत्री श्री दादासाहेब भुसे यांनी पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेशी संवाद साधुन जनताभिमुख कामे करणेसाठी पोलीस दलाने सातत्याने प्रयत्न करावेत असे मार्गदर्शन केले.

सदरील कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते, अपर पोलीस आयुक्त श्री एस. जयकुमार, पोलीस उपआयुक्त श्री विजयकांत सागर, श्री संजयकुमार पाटील, श्री प्रशांत वाघुंडे व इतर पोलीस अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.




मिरा - भाईंदर, वसइ - विरार
पोलीस आयुक्तालय
पोलीस वाहन हस्तांतरण व
पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्याशी सुसंवाद
दिनांक : १७ नोव्हेंबर २०२१ रोजी, दुपारी १२.३० वा.
मा. ना.श्री. दादाजी भुसे
कृषी मंत्री, पालकमंत्री, पालघर जिल्हा यांचे शुभहस्ते
मा. श्री. सदानंद दाते

----------oooo-----------